माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## तक्रार क्रमांक २८६/२०१६

जगन्नाथ पांडुरंग इटनारे,
रा. नांदुरा खुर्द, ता.नांदुरा,
जि.बुलडाणा

**तक्रारकर्ता**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत सिरसोडी,
ता. नांदुरा, जि.बुलडाणा

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तारी अधिकारी (पं), पंचायत समिती नांदुरा,
ता. नांदुरा, जि. बुलडाणा

| माहिती करिता अर्ज /दाखल दि. | ज.मा.अ. यांचे उत्तराचा दि. | प्रथम अपिल अर्ज व दाखल दि. | प्रथम अपिल सुनावणीचा दि. | प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दि. | माहिती पुरविल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|
| ३०.०५.२०१६ | १६.०८.२०१६ | १८.०७.२०१६ | ११.०८.२०१६ | ११.०८.२०१६ | --- |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता 'ज.मा.अ.' तसेच प्रथम अपिलीय अधिकारी करिता 'प्र.अ.अ.'

तक्रार अर्ज व दाखल दिनांकः १९.०७.२०१६/ २२.०७.२०१६

**उपस्थित पक्षः**

| दिनांक १९.०४.२०२२ रोजी | नांव | व्यक्तीशः / प्रतिनिधी |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | | गैरहजर |
| तत्कालीन ज.मा.अ. | मंगेश वानखडे | व्यक्तीशः |

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

**दिनांक:** **१९ एप्रिल २०२२**

## आदेश

१. प्रस्तुत तक्रार क्र.२८६/२०१६ मधील यापुर्वीचा दि.२४.०२.२०२२ रोजीचा आदेश वाचावा.

२. प्रस्तुत प्रकरणामध्ये दि.२४.०२.२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले होते.

> "५. वर्तमान ज.मा.अ. यांनी दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशातील अ.क्र. ९ नुसार अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.
>
> ६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नांदुरा यांनी दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत तत्कालीन ज.मा.अ. एम.पी. वानखडे यांना देवून त्यांचे छायाप्रत वर दिनांकित पोच घेवून पोच पावती आयोगास सादर करावे.
>
> ७. दिनांक २०.०१.२०२२ च्या आदेशातील परिच्छेद ११ मध्ये तत्कालीन ज.मा.अ. यांचे नाव एन.पी. वानखेडे ऐवजी एम.पी. वानखडे वाचण्यात यावे.
>
> ८. तत्कालीन ज.मा.अ. मंगेश वानखडे यांनी दि.२०.०१.२०२२ रोजीच्या आदेशातील अ.क्र.१० नुसार त्यांचे म्हणणे एक महिन्यात आयोगास सादर करावे. तसेच पुढील सुनावणीस समक्ष याबाबत निवेदन सादर करण्याची संधीही देण्यात येत आहे.
>
> ९. पुढील सुनावणीस तत्कालीन ज.मा.अ. मंगेश वानखडे यांचे व्यतिरिक्त इतरांना हजर राहण्याची गरज नाही.

३. दि.२४.०२.२०२२ रोजी वरीलप्रमाणे आदेश देण्यात येवुन प्रकरणात पुढील सुनावणी दि.१९.०४.२०२२ रोजी ठेण्यात आली होती. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात आली.

४. तत्कालीन ज.मा.अ. यांनी सुनावणी दरम्यान असे सांगितले की, अर्जदार यांनी मागणी केलेली मुद्दा क्र. ०१ ची माहिती उपलब्ध नव्हती व मुद्दा क्र. ०४ ची माहिती वैयक्तीक असल्यामुळे अर्जदार यांना पुरवू शकलो नाही. अर्जदाराने मागणी केलेली मुद्देनिहाय माहिती विहीत मुदतीत पुरवू शकलो नाही. त्याबाबत माझ्याकडून चुक झालेली आहे, असे मान्य केले.